सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९५ | शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२६ डिसेंबर

- जगातील पहिले व्यावसायिक सुपरसॉनिक Tu 144 विमानसेवा सुरू झाली.
- टाइम मॅगझिनतर्फे दिला जाणारा मॅन ऑफ द इयर पुरस्कार प्रथमच पर्सनल कॉम्प्युटर, एका अमानवी वस्तूस देण्यात आला.
- विंदा करंदीकर यांना महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार.

## 'काळी माती'च्या माध्यमातून विश्वात दरवळतोय अमळनेरच्या मातीचा सुगंध...!

### अमळनेरचे सुपुत्र डॉ. हेमंतकुमार महाले यांचा चित्रपट आज अमळनेरात होतोय प्रदर्शित...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अमळनेरचे सुपुत्र व हेमंतकुमार म्युझिकल्स या यू ट्युब चॅनलच्या माध्यमातून संगीतविश्वात ज्यांचे लाखो फॉओअर्स व कोट्यवधी व्हिवरशिप आहे असे डॉ. हेमंतकुमार महाले यांनी निर्माता व दिग्दर्शकाच्या भुमिकेतून साकार केलेला 'काळी माती' हा पहिलाच चित्रपट शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी अमळनेर येथील 'एसएस मल्टिप्लेक्स' येथे सकाळी ११ वाजता प्रदर्शित होत आहे. अमळनेरसह राज्यात विविध ठिकाणीही 'काळी माती' हा चित्रपट झळकणार आहे.

सदर चित्रपटाला एका वर्षात ४४४ सर्वोत्तम राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यास इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्‌सने मान्यता दिली आहे. आता सदर चित्रपटासाठी डॉ. श्री. महाले यांनी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड





रेकॉर्डकडे अर्ज केला आहे.

विशेष म्हणजे डॉ. श्री. महाले गेल्या ५ दशकांहुनही अधिक काळापासून हेमंतकुमार ॲण्ड पार्टी व हेमंतकुमार म्युझिकल्स या शिर्षकांच्या माध्यमातून जगभरात गीत, संगीत व नृत्याचे जगभर शो करीत आहेत. त्यांच्या नावावर अनेक प्रतिष्ठीत रेकॉर्डस् आहेत. कित्येक नामवंत पारितोषिकांनी ते सन्मानित आहेत.

स्वतःच्या मध्यमवर्गीय परिवाराला संगीत व चित्रपटाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना श्री. महाले यांनी सिने व संगीत क्षेत्रात मिळविलेली किर्ती अत्यंत कौतुकास्पद व या क्षेत्रातील अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. संगीत व सिने क्षेत्राचा त्यांना कोणताही अनुभव नव्हता. कोठेही रितसर प्रशिक्षण घेतलेले नव्हते. तरीही त्यांनी या क्षेत्रात केलेली प्रगती विशेष अभिमानास्पद व अभिनंदनीय ठरते. त्यांच्या म्युझिकल ग्रुपमध्ये मंगेशकर परिवारासह देशातील सर्वच्या सर्व दिग्गज गायक व वादक यांचा समावेश राहिला आहे. अनेक उभरत्या कलाकारांना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिले आहे. हेच कलावंत आज डॉ. श्री. महाले यांच्या कृपाशिर्वादाने उत्तम नावलौकिक व पैसा कमवित आहेत.

सदर चित्रपट हा सत्य संघर्ष कहाणीवर आधारित आहे. ज्या शेतकऱ्याची ही गौरवगाथा आहे, त्याला उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी खास पाचारण करून त्याचा सन्मान केला आहे, हे विशेष!

अमळनेरकरांनी आपल्या लेकराचा हा चित्रपट आवर्जुन पाहावा, असे आवाहन डॉ. श्री. महाले यांनी अमळनेरकरांना विशेष विनंती करून केले आहे.



## नऊ फूट लांबून फेकतो विष

'हा' आहे जगातील सर्वात खतरनाक साप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

साप दिसताच अनेकांचे पाय लटपट कापतात. जगात असा एक साप आहे जो ९ फूट अंतरावरून विष मानवाच्या डोळ्यात फेकू शकतो. या सापाचे नाव काय आहे? तो कुठे आढळतो याची सविस्तर माहिती जाणून घेऊयात. विष फेकण्याची क्षमता : ९ फूट दूरवरून विष फेकणाऱ्या सापाचे नाव 'मोजाम्बिक स्पिटिंग कोब्रा' असे आहे. हा साप त्याच्या शत्रूवर किंवा भक्ष्यावर साधारणपणे ९ फुटांपर्यंत अंतरावरून विष फेकू शकतो. हे विष तो त्याच्या फणांमधील दातांच्या छिद्रांतून फवाऱ्यासारखे बाहेर फेकतो.

**अचूक निशाणा :** या सापाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा निशाणा. हा साप नेहमी समोरच्या प्राण्याच्या किंवा मानवाच्या डोळ्यांवर लक्ष केंद्रित करतो.

**डोळ्यांवर होणारा परिणाम :** जर या सापाचे विष डोळ्यात गेले, तर त्यामुळे प्रचंड जळजळ होते. वेळेवर उपचार न मिळाल्यास त्या व्यक्तीला कायमचे अंधत्व येऊ शकते. कारण हे विष डोळ्यांच्या पेशींना गंभीर इजा पोहोचवते.

**विषाचा प्रकार :** याचे विष प्रामुख्याने सायटोटॉक्सिक असते. हे विष त्वचेच्या पेशी आणि ऊतींना नष्ट करते. ज्यामुळे जखम होऊन तिथे सूज येते आणि शरीराचा तो भाग सडू लागतो.

**शरीररचना :** हे साप साधारणपणे ४ ते ६ फूट लांब असतात. मात्र, काही प्रजाती अधिक मोठ्या असू शकतात. त्यांचा रंग राखाडी, तपकिरी किंवा काळपट असतो. हा साप आफ्रिका खंडात (मोझांबिक, दक्षिण आफ्रिका, टांझानिया) आणि आग्नेय आशियात (फिलीपिन्स, मलेशिया) आढळतो.



(छायाचित्र: रजनीकांत पाटील)

# 'धूम स्टाईल' दुचाकीस्वार पोलिसांच्या रडारवर

### अमळनेरात ४७ जणांवर कारवाई, ६३ हजार रूपयांचा ठोठावला दंड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अल्पवयीन मुलांचे 'धूम स्टाईल' दुचाकी चालविण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांची नाकाबंदी सुरू आहे. आतापर्यंत ४७ जणांवर पोलिसांनी कारवाई करून ६३ हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

बुधवार, दि. २४ डिसेंबर रोजी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांच्या आदेशाने पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी नाकाबंदी लावली आहे. मोटार वाहन कायद्यांतर्गत नियमबाह्य दुचाकीस्वारांवर कारवाई सुरू आहे. फरशी रोड, गलवाडे, धार रस्ता, दगडी दरवाजा, ग्लोबल शाळेजवळ पोलीस उपनिरीक्षक रवींद्र पिंगळे, हेडकॉन्स्टेबल संजय बोरसे, विनय पाटील



> "पालकांनी अल्पवयीन मूलमुलींना मोटारसायकल देऊ नये. मुले- मुली शाळा, महाविद्यालयात अथवा शिकवणीला तथा फिरायला जाताना तीन ते चार सीट बसवून वेगाने जातात. त्यांच्यावर आता कडक कारवाई केली जाईल.
> **- दत्तात्रय निकम,** पोलिस निरीक्षक, अमळनेर.

व रवींद्र बोरसे यांनी ही कारवाई केली आहे. सोळा वर्षाआतील लहान चार मुले मोटारसायकल चालवताना आढळून आले. त्यांच्या पालकांना प्रत्येकी पाच हजार प्रमाणे २० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. तसेच नंबर प्लेट नसलेल्या २० वाहनांवर कारवाई करून त्यांच्याकडून दहा हजार रुपये, तर ट्रिपल सीट जाणाऱ्या ७ वाहनांवर कारवाई करून ७ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. वाहन चालविण्याचा परवाना नसलेल्या ४ वाहनचालकांना प्रत्येकी ५ हजार रूपये प्रमाणे २० हजार रुपये दंड आकार आला. परवाना असूनही वाहन चालवताना परवाना न बाळगणाऱ्या ९ जणांना ५ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला. रस्त्यात वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या एकास ५०० रुपये दंड आकारण्यात आला.

#### डीवायएसपींनी काढले सायलेन्सर

फरशी पुलावर स्वतः पोलीस उपअधीक्षक विनायक कोते उपस्थित होते. त्याचवेळी एक कर्णर्कश आवाज करणारी एक मोटरसायकलस्वार

पान ३ वर

## 'चू- चू हेडफोन्स'ची चिमुकल्यांमध्ये वाढली क्रेझ

### सोशल मीडिया ठरला 'ट्रेंड सेटर'; तरुणींनाही पडली भुरळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या थंडी वाढताच उबदार कपड्यांबरोबरच फॅशन ॲक्सेसरीजचीही मागणी वाढली आहे. यंदा एक आगळा-वेगळा फॅशन ट्रेंड सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. रस्त्यावरील फेरीवाले असोत की सोशल मीडियावरील रील्स सर्वत्र सध्या रंगीत आणि आकर्षक 'चू-चू हेडफोन्स'चीच चर्चा रंगताना दिसत आहे. व्हायरल व्हिडिओंच्या प्रभावामुळे या हेडफोन्सची क्रेझ कमालीची वाढली आहे. रंगीबेरंगी, मऊ-मुलायम आणि कार्टून लूक असलेले हे हेडफोन्स खास 'उडणारे कान' या वैशिष्ट्यामुळे वेगळे ठरतात. सशाचे किंवा मांजरीसारखे दिसणारे कान डोक्यावर उडताना दिसत असल्याने लहान मुलांसह तरुणीही या हेडफोन्सकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत.

#### मागणीनुसार वाढले दर

गेल्या वर्षी १५० ते २०० रुपयांमध्ये मिळणारे हे हेडफोन्स मागणी वाढल्याने २५० ते ३०० रुपयांपर्यंत विकले जात आहेत. लहान मुलांना तर याची चांगली भुरळ पडली आहे. मात्र, महाविद्यालीयीन तरुणींनाही याची भुरळ पडली आहे. सोशल मीडियावर रिल्स करण्यासाठी अनेक जण याचा वापर करीत आहे, असे एका व्रिकेत्याने सांगितले.

#### इंटरॲक्टिव्ह तंत्रज्ञानाची भुरळ

या 'चू-चू हेडफोन्स'ची खासियत म्हणजे त्याचा इंटरेक्टिव्ह मेकॅनिझम. हेडफोनच्या खालच्या बाजूला असलेले दोन गोल पंप दाबताच वरच्या बाजूला असलेले दोन 'कान' उडतात आणि त्याचवेळी हलकासा 'चू-चू' किंवा 'पॉप' असा आवाज येतो. त्यामुळे हे हेडफोन्स केवळ ऐकण्यासाठीच नव्हे, तर खेळकर मनोरंजनासाठीही वापरले जात आहेत.



## श्रद्धा, सेवा व संस्कारांचा आजपासून दिव्य उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : परमपूज्य प्रमुख स्वामीजी महाराज यांच्या अमळनेर आगमनाच्या १९७६-२०२६ सुवर्ण महोत्सवानिमित्त तसेच बीएपीएस श्री स्वामिनारायण मंदिराच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त येथे भव्य अध्यात्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २६ व २७ डिसेंबर रोजी होणाऱ्या या महोत्सवात पूज्य ज्ञानेश्वर स्वामीजी (सारंगपूर) व पूज्य जे. आनंदजीवन स्वामीजी (धुळे) यांची पावन उपस्थिती लाभणार आहे.



अभिषेक, महायज्ञ, मुख्य सभा व भव्य शोभायात्रा असे विविध कार्यक्रम याप्रसंगी होणार आहेत. या महोत्सवास भाविकांनी सहकुटुंब उपस्थित राहून या दिव्य पर्वाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पूज्य योगीस्नेह स्वामीजी व पूज्य अखंडमुनी स्वामीजी तसेच बीएपीएस स्वामिनारायण सत्संग मंडळातर्फे करण्यात आले आहे. दरम्यान कार्यक्रमाची तयारी पूर्णात्वास आली आहे.

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८



जाहीर नम्र विनंती



मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत

मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)

कार्यकारी मंडळ सदस्य पदाच्या उमेदवार



अनुक्रमांक १२
निवडणूक चिन्ह : रिक्षा



लीना प्रवीण पाटील

अनुक्रमांक १२ समोरील रिक्षा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८



जाहीर नम्र विनंती

मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत

मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)

कार्यकारी मंडळ सदस्य पदाचे उमेदवार



अनुक्रमांक १७
निवडणूक चिन्ह : कपाट



जितेंद्र शांतीलाल झाबक

अनुक्रमांक १७ समोरील कपाट या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा

खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगाव)
त्रैवार्षिक निवडणूक - २०२५-२०२८



जाहीर नम्र विनंती

मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत

मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज,
अमळनेर, (जि.जळगाव)

अध्यक्ष पदाचे उमेदवार



अनुक्रमांक २
निवडणूक चिन्ह : पंखा



विनोद जगदीश अग्रवाल

अनुक्रमांक २ समोरील पंखा या चिन्हावर फुलीचा शिक्का मारा




# सकाळचा पहिला घास : शरीरासाठी वरदान की विष?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सकाळी उठल्यानंतरचा पहिला आहार तुमच्या आरोग्याचा पाया ठरतो. योग्य पदार्थ निवडल्याने दिवसभर ऊर्जा, एकाग्रता आणि ताजेतवानेपणा मिळतो, तर चुकीच्या आहारामुळे पचन बिघडणे, थकवा किंवा आम्लपित्त यांसारख्या समस्या उद्‌भवू शकतात. झोपेतून उठल्यानंतर शरीर अन्नाशिवाय काही तास काम करते. त्यामुळे चयापचय सुरू करण्यासाठी आणि दिवसभराची ऊर्जा मिळविण्यासाठी योग्य इंधनाची गरज असते. सकाळचा नाश्ता केवळ पोट भरण्यासाठी नसून, शरीराला पोषण देण्यासाठी आहे. चला, रिकाम्यापोटी खाण्यास योग्य आणि टाळावे असे पदार्थ जाणून घेऊया.

## रिकाम्यापोटी खाण्यास योग्य ८ पदार्थ

**१) कोमट लिंबूपाणी :** सकाळी कोमट पाण्यात लिंबू पिळून प्यायल्याने चयापचय सुरू होते. पचन सुधारते आणि शरीरातील विषद्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते.

**२) ओट्स :** फायबरने समृद्ध ओट्स पोट जास्त काळ भरलेले ठेवतात. रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतात.

**३) दही :** प्रोबायोटिक्सने युक्त दही पचनसंस्थेला बळकटी देते. सकाळी हलका, पौष्टिक पर्याय आहे.

**४) अंडी :** प्रथिने, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध अंडी पोटभर आणि ऊर्जादायी नाश्त्यासाठी उत्तम आहे.

**५) ग्रीन टी :** अँटिऑक्सिडंट्सने भरलेली ग्रीन टी चरबी जाळण्यास आणि मेंदूला सतर्क ठेवण्यास मदत करते.

**६) ब्लूबेरी :** कमी कॅलरी आणि जास्त फायबर असलेली ब्लूबेरी वजन नियंत्रणासाठी आणि पचनासाठी उत्तम आहे.

**७) बदाम :** हेल्दी फॅट्स, प्रथिने आणि फायबरमुळे बदाम सकाळी ऊर्जा देतात आणि भूक नियंत्रित ठेवतात.

**८) चिया बिया :** ओमेगा-३ आणि फायबरने युक्त चिया बिया दीर्घकाळ टिकणारी ऊर्जा प्रदान करतात.



## रिकाम्यापोटी टाळावेत असे ८ पदार्थ

**१) कॉफी :** रिकाम्यापोटी कॉफी प्यायल्याने पोटातील आम्ल वाढते, ज्यामुळे छातीत जळजळ किंवा पोटाच्या समस्या उद्‌भवू शकतात.

**२) तिखट पदार्थ :** मिरची किंवा मसालेदार पदार्थ खाल्ल्याने पोटाच्या अस्तरांना त्रास होऊन आम्लता किंवा वेदना होऊ शकते.

**३) लिंबूवर्गीय फळे :** संत्री, मोसंबी यांसारख्या फळांमधील नैसर्गिक आम्ल रिकाम्यापोटी जळजळ निर्माण करू शकते. विशेषतः कमकुवत पचनसंस्थेला.

**४) गॅसयुक्त पेये :** सोडा किंवा कार्बोनेटेड पेयांमुळे पोटात गॅस, फुगणे किंवा ढेकर यांसारख्या समस्या होऊ शकतात.

**५) साखरयुक्त पदार्थ :** डोनट्स, केक किंवा साखरयुक्त पेयांमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण अचानक वाढते. नंतर कमी होऊन थकवा, चिडचिड किंवा डोकेदुखी होऊ शकते.

**६) तळलेले पदार्थ :** समोसे, वडे, भजी यांसारख्या तेलकट पदार्थांमुळे पोटात जडपणा आणि आळस येऊ शकतो.

**७) प्रोसेस्ड फूड :** चिप्स, इन्स्टंट नूडल्स किंवा पॅकेट स्नॅक्समधील प्रिझर्व्हेटिव्ह्ज आणि कृत्रिम चव गॅस किंवा पोटदुखीचे कारण बनू शकतात.

**८) काही दुग्धजन्य पदार्थ :** दूध, चीज किंवा क्रीममधील लॅक्टोजमुळे लॅक्टोज असहिष्णुता असणाऱ्यांना गॅस किंवा सैल हालचाल होऊ शकते. अशांनी सकाळी हलके पर्याय निवडावेत.

सकाळचा आहार वजन, पचन, त्वचा, मेंदूची कार्यक्षमता आणि मूडवर थेट परिणाम करतो. योग्य पदार्थ निवडल्याने कमी खाल्ले तरी ऊर्जा टिकते, तर चुकीच्या पदार्थांमुळे दिवसभर थकवा किंवा अस्वस्थता जाणवू शकते. त्यामुळे सकाळी पौष्टिक आणि संतुलित आहार निवडा. ज्यामुळे तुमचा दिवस ताजेतवाने आणि उत्साही जाईल.

---

**सक्सेस स्टोरी**

# फक्त दोन हजार रुपयांची गुंतवणूक; आज तीस लाखांची उलाढाल

## शेतकऱ्यांमध्ये चर्चेचा विषय असलेल्या तरुणाचा व्यवसाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



‘ कोरोना ’च्या काळात ओडिशातील एका तरुणाने केवळ दोन हजार रुपयांच्या गुंतवणुकीने गांडूळ खत बनविण्याचा व्यवसाय सुरू केला. आज हा व्यवसाय ‘ खुशी अ‍ॅग्रो ’ नावाने ओळखला जातो. त्यातून वार्षिक तीस लाख रुपयांची उलाढाल होत आहे. याशिवाय पंधराहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. जितेंद्र मोहराणा यांचे हे कार्य प्रेरणादायीच म्हणावे लागेल.

### दोन हजार रुपयांत सुरूवात

ओडिशाच्या नवरंगपूर जिल्ह्यातील झारिगाव गावचे जितेंद्र मोहराणा यांनी कोरोना महामारीच्या काळात जेव्हा त्यांना पुरेसा वेळ मिळाला तेव्हा त्यांच्या किचन गार्डनसाठी गांडूळ खत बनविण्यास सुरूवात केली. सुरूवातीची गुंतवणूक केवळ दोन हजार रुपये होती. लहान टाक्यांमध्ये सुरू झालेली ही प्रक्रिया लवकरच व्यावसायिक संधी दिसू लागली. जितेंद्र यांना वाटले, की ही शाश्वत पद्धत केवळ त्यांच्या शेतीसाठीच नव्हे, तर इतर शेतकऱ्यांसाठीही फायदेशीर ठरेल.

### खताचे खास वैशिष्ट्य

जितेंद्र यांच्या खताचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यात ९० टक्के कच्चा माल स्थानिक गाईच्या शेणापासून तयार होतो. उर्वरित १० टक्के लाकूड आणि सुकी पाने मिसळून खताची रचना मजबूत केली जाते. वाढत्या मागणीमुळे त्यांनी लहान टाक्या सोडून मोठ्या मैदानावर आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढविले. यामुळे खताची गुणवत्ता आणि विश्वासार्हता वाढली.

### उत्पादन परराज्यांत पोहोचले

‘ खुशी अ‍ॅग्रो ’ या फर्मची स्थापना करून जितेंद्र यांनी १ किलो ते ५० किलोपर्यंतच्या पॅकिंगमध्ये खत बाजारात आणले. हे उत्पादन ओडिशातील कालाहांडी, कोरापूट, बोलंगीर जिल्ह्यांबरोबरच शेजारील छत्तीसगडपर्यंत पोहोचले आहे. यामुळे त्यांचे यश केवळ आर्थिक नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे ठरले आहे.

### इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि रोजगार

जितेंद्र यांचे फार्म आता १५ हून अधिक पूर्णवेळ कामगारांना रोजगार देत आहे. ज्यात अनेक बेरोजगार तरुणांचा समावेश आहे. इतकेच नव्हे, तर ते इतर शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय खत बनविण्याच्या कार्यशाळा आयोजित करतात. यात गांडूळ खत तयार करण्याची टप्प्या-टप्प्याची प्रक्रिया, रासायनिक खतांच्या नुकसानीबद्दल जागरूकता आणि शाश्वत शेतीचे फायदे शिकविले जातात. सेंद्रिय खतांमुळे मातीचे आरोग्य सुधारते, उत्पादनाची गुणवत्ता वाढते आणि शेल्फ-लाइफही लांबते, असे ते अधोरेखित करतात.

### भविष्यातील योजना

जितेंद्र यांचा प्रवास सरकारी योजना आणि तळागाळातील प्रयत्नांचे एक उत्तम उदाहरण आहे. आता ते व्यवसाय विस्तार करत लिक्विड बायो-फर्टिलायझरसारखी नवीन उत्पादने बाजारात आणण्याची योजना आखत आहेत. फक्त दोन हजार रुपयांपासून तीस लाखांपर्यंतचा हा प्रवास सिद्ध करतो, की इनोव्हेशन, शाश्वतता आणि उद्योजकता यांचा मेळ भारतातील कृषी क्षेत्राला उज्ज्वल भविष्य देऊ शकतो.

---

# पोहे खाऊन आयुष्य बदलले !

## तमन्ना भाटियाने सांगितले फिटनेस सिक्रेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तमन्ना भाटियाला बॉलीवूडची ‘मिल्की ब्यूटी’ म्हणून ओळखले जाते. नुकताच तीने ३६वा वाढदिवस साजरा केला. तिची सुंदर, तजेलदार अन् नितळ त्वचा, तमन्नाचा फिटनेस, तिच्या नृत्यशैलीची सोशल मीडियावर कायम चर्चा होत असते. वजन नियंत्रित ठेवण्यासाठी अभिनेत्री काय खाते? तिची दिनचर्या नेमकी कशी असते याबद्दल तमन्नाने स्वतः एका मुलाखतीत खुलासा केला होता. याबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊयात.

तमन्ना भाटिया सकाळी ब्रेकफास्टमध्ये पोहे खाण्यास प्राधान्य देते. तिच्या वेटलॉस जर्नीमध्ये याचा प्रचंड फायदा झाला असे तमन्नाने एका मुलाखतीत सांगितले आहे. तमन्ना पुढे म्हणाली, की



सकाळी पोहे खाल्ल्यामुळे दिवसभर पोट भरल्यासारखे वाटते आणि महत्त्वाचे म्हणजे व्यवस्थित नाश्ता केल्यामुळे कामासाठी ऊर्जा मिळते आणि मला वजन नियंत्रित करायला पोह्यामुळे खूप फायदा झाला. दुग्धजन्य पदार्थ खाणेही बंद केले आहे. मी साधे घरी बनवलेले पोहे खाते. ज्यात बटाटाही घातलेला असतो. मात्र, कालांतराने भरपूर मोड आलेली कडधान्ये घालून मी पोहे खायला सुरुवात केली. मला तेव्हा वजन कमी करायचे होते. हे माझ्या वेटलॉस जर्नीसाठी खूप फायदेशीर ठरले होते. याद्वारे भरपूर व्हिटॅमिन्स मिळतात. कडधान्य आणि पोह्यांमुळे तुमची पचनक्रिया सुधारते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्यामुळे पोहे हा निश्चितच सकाळच्या ब्रेकफास्टसाठी एक पौष्टिक पर्याय आहे. चांगल्या आहारामुळे तुमच्या जीवनशैलीत बराच फरक पडतो. अनेकदा काही पदार्थांची आपल्या शरीराला ॲलर्जी असते आणि त्याबाबत आपल्याला काहीही माहिती नसते. गेली अनेक वर्षे मला माहिती नव्हते, की मला ग्लूटेन आणि दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी आहे. मला हळुहळू हे लक्षात आले, की ग्लूटेन आणि दुग्धजन्य पदार्थांचे सेवन टाळल्यावर माझी त्वचा आणखी तजेलदार होतेय. आपला रोजचा आहार आणि त्याचा शरीरावर होणारा परिणाम यावर आपण नीट विचार केला हवा.

---

# पालेभाज्यांचे आरोग्यदायी गुण

पालेभाज्या आपल्या आहाराचा अविभाज्य भाग आहेत. त्या केवळ चवदारच असतात असे नव्हे, तर आरोग्यासाठी अनेक औषधी गुणांनी युक्त असतात. आयुर्वेदात पालेभाज्यांचे महत्त्व सविस्तर सांगितले आहे. खाली काही प्रमुख पालेभाज्या आणि त्यांचे गुणधर्म दिले आहेत.

### अळू




अळू ही रक्तवर्धक, ताकद वाढविणारी आणि मलप्रवृत्ती नियंत्रित करणारी पालेभाजी आहे. बाळंतिणींना दूध कमी येत असल्यास अळूची पाने आणि देठ यांची भाजी उपयुक्त आहे. पानांचा रस आणि जिरेपूड यांचे मिश्रण पित्तावर गुणकारी आहे. फुरसे किंवा विषारी प्राण्यांचा दंश झाल्यास अळूची पाने वाटून लेप लावावा आणि रस प्यावा. गळू किंवा फोड फुटण्यासाठी देठ वाटून बांधावे.

### अंबाडी




अंबाडीची भाजी रुचकर असली तरी उष्ण आणि कफवर्धक आहे. डोळ्यांचे विकार, त्वचारोग किंवा रक्तदोष असणाऱ्यांनी ती टाळावी. तिची पाने पचायला जड असतात. त्यामुळे मर्यादित प्रमाणात खावी.

### करडई



करडई ही उष्ण आणि कफ प्रकृतीच्या लठ्ठ व्यक्तींसाठी उपयुक्त आहे. ती चरबी आणि वजन वाढू देत नाही. तिच्या रसाने लघवी साफ होते. पण डोळ्यांचे आणि त्वचेचे विकार असणाऱ्यांनी ती टाळावी. करडईच्या बियांचे तेल (सफोला) कमी उष्मांकांमुळे प्रसिद्ध आहे.

### कुरडू



कुरडूच्या बिया मूतखड्यावर उपयुक्त आहेत, तर पाने लघवी साफ करतात आणि कफ कमी करतात. जुनाट खोकला, दमा किंवा वृद्धांचे कफविकार यावर कुरडूची कोवळी पाने किंवा शिजवलेली भाजी फायदेशीर आहे.

### कोथिंबीर



कोथिंबीर चटणी, कोशिंबीर, सूप, आमटी, भात यांसारख्या पदार्थांची चव वाढवते. ताजी कोथिंबीर शीतगुणाची, पाचक आणि रुची वाढविणारी आहे. तिखट पदार्थांमुळे होणारी पित्ताची जळजळ कमी करते. औषधांच्या दुष्परिणामांमुळे (उदा.- पित्त, खाज, गळवे) त्रास होत असल्यास कोथिंबिरीचा रस प्यावा आणि लेप लावावा. रक्तशुद्धी आणि तापातील शोष कमी करण्यासाठी ताज्या कोथिंबिरीचा रस उत्तम आहे.

### घोळ



घोळाची भाजी बुळबुळीत असली तरी औषधी आहे. ती शीतगुणाची, पाचक आणि यकृताचे कार्य सुधारणारी आहे. मूळव्याध, रक्ती, दातातून रक्त येणे, सूज, मूत्रपिंडाचे विकार आणि नागीण यावर तिच्या पानांचा लेप आणि भाजी फायदेशीर आहे.

### चाकवत



चाकवत सर्वत्र उपलब्ध आहे आणि आयुर्वेदात श्रेष्ठ मानली जाते. ताप, अग्निमांद्य, कावीळ, छातीत जळजळ यांसारख्या तक्रारींवर ती उपयुक्त आहे. ताकासोबत कमी मसाल्यांची चाकवताची पातळ भाजी पथ्यकर आहे. लसूण, आले, जिरे, हिंग, तूप, गूळ यांचा अनुपान म्हणून वापर करावा.

### चुका



चुका ही आंबट चवीची, उष्ण आणि पाचक पालेभाजी आहे. ती वातानुलोमन करते आणि संग्राहक गुणामुळे योनीभ्रंश किंवा गुदभ्रंशावर तेलासोबत उपयुक्त आहे. पचायला जड पदार्थांसोबत चुक्याची पाने खावीत.

### तांदुळजा



तांदुळजा ही मधुर, शीतवीर्य आणि ‘ सी ’ जीवनसत्त्वाने युक्त आहे. गोवर, कांजिण्या, तीव्र ताप, विषविकार, नेत्रविकार, पित्त, मूळव्याध, यकृतविकार यावर ती पथ्यकर आहे. तिचा रस लघवी साफ करतो, उष्णता कमी करतो आणि धातूंच्या विषावर (उदा.- पारा, उंदीर) प्रभावी आहे. बाळंतिणी आणि गरोदर स्त्रियांसाठी ती वरदान आहे.

---

# क्रेडिट कार्ड किंग : १,६३८ क्रेडिट कार्डस्... ना दिखावा, ना कर्ज! गीनिज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर, स्मार्ट मनी प्लॅनिंगने कमाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय नागरिक मनीष धमेजा याने १,६३८ वैध क्रेडिट कार्डस्‌चा जागतिक रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. उल्लेखनीय म्हणजे त्यांच्यावर एक रुपयाचेही कर्ज नाही. या कार्डस्‌द्वारे ते रिवॉर्डस् कॅशबॅक आणि प्रवासाचे फायदे मिळवितात. ज्यामुळे त्यांचा छंद कमाईचा स्रोत बनला आहे.

### गीनिज वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर :

मागील काही वर्षांत क्रेडिट कार्ड वापराचा ट्रेंड वाढला आहे. आजकाल वॉलेटमध्ये क्रेडिट कार्ड असले, की स्टेटस वाढतो असे मानले जाते. क्रेडिट कार्ड फायदेशीर असले तरी चुकीच्या वापराने कर्जाचा सापळा होऊ शकतो. पण भारतातील मनीष धमेजा नावाच्या व्यक्तीकडे १,६३८ सक्रिय क्रेडिट कार्डस् आहेत. त्यांच्यावर शून्य कर्ज आहे. ही व्यक्ती गीनिज वर्ल्ड रेकॉर्डधारक आहे.

### सर्वाधिक क्रेडिट कार्डस्‌चा संग्रह

क्रेडिट कार्डचा विचार आला, की शॉपिंग, बिल पेमेंट आणि कर्जाचे ओझे आठवते. अनेकांसाठी हे कर्जाचा सापळा आहे. मात्र मनीष धमेजाने ही धारणा चुकीची ठरविली. त्यांनी छंदाला स्मार्ट उत्पन्न स्रोतात रूपांतरित करून गीनिज रेकॉर्ड मिळविला. ३० एप्रिल २०२१ रोजी हैदराबाद येथे त्यांनी हा रेकॉर्ड नोंदविला.

### इतक्या कार्डस्‌चा काय उपयोग?

मनीष यांच्याकडे असलेले कार्डस् केवळ संग्रहासाठी नाहीत, तर रिवॉर्डस्, कॅशबॅक, प्रवास भत्ते आणि हॉटेल डिस्काउंट्ससाठी आहेत. इन्व्हेस्टअप मीडियानुसार ते हे कार्डस् ‘ पैसे छापण्याच्या मशीनप्रमाणे ’ वापरतात आणि शून्य कर्ज राखतात.





### ‘ क्रेडिट कार्ड आणि नाण्यांचा किंग ’

मनीष धमेजा हे क्रेडिट कार्ड आणि नाण्यांच्या संग्रहासाठी गीनिज रेकॉर्डधारक आहेत. त्यांना ‘ किंग ऑफ क्रेडिट कार्ड अ‍ॅण्ड कॉईन्स ’ म्हणून ओळखले जाते. मूळत : उत्तर प्रदेशातील लखनौचे रहिवासी, सध्या ते हैदराबाद येथे राहतात. त्यांनी विविध क्षेत्रांत काम केले आहे.

### शिक्षण आणि करिअर

मनीष यांचा शैक्षणिक प्रवास प्रभावी आहे. त्यांनी कानपूर येथील सीएसजेएम विद्यापीठातून बी.एससी. (पीसीएम - भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) पूर्ण केली. त्यानंतर लखनौ येथील इंटिग्रल विद्यापीठातून एमसीए (मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स), इग्नू येथून सोशल वर्कमध्ये पदव्युत्तर पदवी, बिट्स पिलानी येथून डेटा सायन्समध्ये एम.टेक. आणि ॲमिटी विद्यापीठातून एमबीए मिळविले. सध्या ते भारत सरकारच्या दूरसंचार विभागात कार्यरत आहेत आणि द न्यूमिझमॅटिक सोसायटी ऑफ इंडियाशी संलग्न आहेत. त्यांचा परिश्रम आणि समर्पण यामुळे अनेक क्षेत्रांत यश मिळविले.

### क्रेडिट कार्ड वापरताना सावधगिरी

भारतात क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांची संख्या वाढत आहे. पण चुकीच्या प्लॅनिंगमुळे अनेक कर्जाच्या जाळ्यात अडकतात. मनीष यांनी सिद्ध केले, की स्मार्ट वापराने फायदे मिळविता येतात - जसे मोफत तिकिटे, कॅशबॅक. पण इतके कार्ड हाताळणे कठीण असते; ते क्रेडिट स्कोअरवर परिणाम करू शकते. मनीष हे विवेकाने व्यवस्थापित करतात. ज्यामुळे त्यांचा संग्रह सक्रिय राहतो.

### स्मार्ट मूव्हजने कमाई

मनीष यांना ‘ किंग ऑफ कार्ड अ‍ॅण्ड कॉईन्स ’चा मान केवळ संख्येमुळे नाही, तर स्मार्ट वापरामुळे मिळाला. ते प्रत्येक कार्डाचे फायदे आणि अटींचा अभ्यास करतात - जसे कोणते कार्ड जास्त कॅशबॅक देईल किंवा प्रवासासाठी लाउंज एक्सेस.

### मनीषची स्ट्रॅटेजी

मनीष यांचे धोरण ‘ शून्य कर्ज ’वर आधारित आहे. ते क्षमतेपेक्षा जास्त खर्च करत नाहीत. बिल वेळेवर भरतात. यामुळे व्याजापासून मुक्ती मिळते आणि क्रेडिट स्कोअर उत्कृष्ट राहतो. त्यांच्या उत्कटतेने आणि हुशारीने काहीही साध्य करता येते, हे दाखविणारा हा प्रवास आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मिटर बसवू नये!

## महावितरण कंपनीचा निर्णय; वीज ग्राहकांना मोठा दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : घरी कर्ता व्यक्ती असल्याशिवाय स्मार्ट मीटर बसवविण्यात येऊ नयेत, अशा तक्रारी वाढल्या आहेत. शासनानेही ग्राहकांच्या परवानगीशिवाय मीटर न बसविण्याचे निर्देश दिले आहेत. नियमांनुसार स्मार्ट मीटर बसवणे अनिवार्य असले, तरी या प्रकारची सक्ती कोणी करू शकत नाही. म्हणून आता ग्राहक तक्रार नोंदवू शकणार आहेत, असा निर्णय महावितरण कंपनीने घेतला आहे.

विजेच्या वापरासाठी स्मार्ट मीटर योजना सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. इतकेच नाही तर स्मार्ट मीटर लावण्याचे कंत्राटही देण्यात आले. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयाला राज्यातील ग्राहकांकडून तीव्र विरोध होत आहे. हा विरोध लक्षात घेता आता राज्य सरकारने एक पाऊल मागे टाकत घरात कुणी नसेल तर स्मार्ट मीटर लावले जाणार नसल्याचा निर्णय घेतला आहे. घरगुती वापरासाठी, औद्योगिक आणि मोठ्या वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहे. यासंदर्भातील माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**तुम्ही काय करू शकता ?**



जर तुमच्या घरात कोणी नसताना स्मार्ट मीटर बसवले गेले असेल, तर वीज वितरण कंपनीकडे तक्रार करा, त्यांना ई-मेल पाठवून किंवा लेखी कळवून मीटर न बसवण्याबद्दल कळवा आणि रीतसर लेखी पुष्टी मागा.

**स्मार्ट मीटरची सद्यस्थिती**

अनेक ठिकाणी ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. हे प्रकार थांबविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. कायदेशीर तरतुदी वीज (ग्राहकांचे हक्क) नियम, २०२० नुसार मीटरशिवाय कनेक्शन दिले जाणार नाही, अशी तरतूद आहे. मात्र, स्मार्ट मीटर सक्तीचे आहे की नाही यावर वाद सुरू आहे. स्मार्ट मीटरच्या सक्तीच्या अंमलबजावणीला जनतेकडून आणि काही राजकीय पक्षांकडून विरोध होत आहे.

**सध्याचे मीटर आणि स्मार्ट मीटरमध्ये काय फरक?**

स्मार्ट मीटर हे प्रीपेड स्वरूपाचे आहे. म्हणजेच तुम्ही जेवढे रिचार्ज कराल तेवढी वीज तुम्हाला वापरता येईल. स्मार्ट मीटरच्या माध्यमातून वीज चोरी टाळता येईल. तसेच चुकीचे मीटर रीडिंग आणि अवाजवी बिले टाळता येईल, असा दावा कंपन्यांनी केला आहे. तर सध्याचे मीटर हे पोस्टपेड प्रमाणे आहे. म्हणजेच तुम्ही विजेचा वापर करता आणि त्यानंतर वीज कर्मचारी महिन्याला त्या विजेच्या वापराचे रीडिंग घेऊन मग त्याआधारे तुम्हाला वीज बिल पाठवण्यात येते. ▲

### 'धूम स्टाईल' दुचाकीस्वार पोलिसांच्या रडारवर

**पान १ वरून :** आला होता. तेथेच मॅकेनिकला बोलावून त्याच्या वाहनाचे सायलेन्सर काढून टाकले. त्या वाहनास जुने सायलेन्सर लावून ५०० रुपयांचा दंडही आकारला आहे.

दरम्यान, बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहने उभी राहतात. बस जायला सुद्धा जागा राहत नाही. रिक्षा अर्ध्या रस्त्यावर येतात. बालेमिया मशिदीजवळ फळ विक्रेते, हातगाड्या धारकांनी अतिक्रमण करून रस्ताच अडवून टाकला आहे. त्याचप्रमाणे बोरी नदी पूल तर जणू बाजारपेठच झाला आहे, अशी अवस्था आहे. पैलाड नाक्यावर देखील वाहतूक अडवली जाते. त्याठिकाणी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# अमळनेरात रविवारी 'शौर्य मिरवणूक

## वि.हिं.प., बजरंगदलातर्फे आयोजन; मंगळ ग्रह सेवा संस्थेचे सहकार्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या अमळनेर प्रखंड यांच्यातर्फे रविवार, दि. २८ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता शौर्य मिरवणूक निघणार आहे. परिसरातील बजरंग दलच्या कार्याची ओळख, शौर्य, शिस्त व संघटनात्मक एकजूट समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. या मिरवणुकीस मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अनमोल सहकार्य लाभणार आहे. या शौर्य मिरवणुकीस धरणगाव येथील ह. भ. प. श्री. सुरेशजी महाराज (सारवेकर) यांची उपस्थिती लाभणार आहे. देवगिरी प्रांत बजरंग दल पालक (नांदेड) श्री. कृष्णाजी देशमुख हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील.

मिरवणुकीचा मार्ग

म्हस्कर प्लॉट येथुन मिरवणुकीस सुरुवात होईल. सुभाष चौक, तिरंगा चौक, महाराणा प्रताप चौक, रेल्वे स्टेशन, स्वामीनारायण मंदिर असा मिरवणुकीचा मार्ग निश्चित करण्यात आला आहे. स्वामीनारायण मंदिर परिसरात मिरवणुकीचा समारो होईल. या शौर्य मिरवणुकीच्या यशस्वी आयोजनासाठी मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अमूल्य सहकार्य लाभणार आहे. "जब- जब देश पुकारेगा, हम सबसे आगे मिलेंगे" या घोषवाक्यासह बजरंग दलाचे कार्यकर्ते शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी होणार आहेत. सर्व स्वाभिमानी राष्ट्रभक्त हिंदू तरुणांनी या शौर्य मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद व बजरंग दलातर्फे करण्यात आले आहे. ▲

## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# भरतसिंग पाटील लिखित ग्रंथांवर चिंतन चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील महाराष्ट्र साहित्य परिषद प्रताप महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे 'ग्रंथ : चिंतनचर्चा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रताप महाविद्यालयातील पूज्य साने गुरुजी सभागृहात सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी हा उपक्रम राबण्यित आला. मराठीतचे प्रसिद्ध समीक्षक डॉ. भरतसिंग पाटील लिखित 'जी.ए. : अज्ञेयाचे यात्रिक (आदिबंधात्मक शोध)' आणि 'पाण्यारण्य : तृष्णेची शोधयात्रा (आदिबंधात्मक अन्वयार्थ)' या दोन समीक्षा ग्रंथांवर चिंतनचर्चा झाली.

मराठीतील आदिबंधात्मक या समीक्षा पद्धतीचे स्वरूप, वैशिष्ट्ये व उपयुक्ततेसंदर्भात विविध तपशील देऊन चर्चा झाली. अमळनेर शिक्षण मंडळाचे सचिव संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. प्रताप महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव प्रमुख पाहुणे होते.

पहिल्या व्याख्यानात 'जी. ए. : अज्ञेयाचे यात्रिक (आदिबंधात्मक शोध)' या समीक्षा ग्रंथावर प्रा. नितीन पाटील यांनी चिंतनात्मक चर्चा केली. त्यांच्या मांडणीत जी. ए. कुलकर्णी यांच्या साहित्यविश्वाचा शोधक दृष्टिकोन, लेखनातील तत्त्वचिंतन तसेच आदिबंधात्मक समीक्षेची वैशिष्ट्ये सखोलपणे उलगडून सांगितली. ग्रंथाच्या आशयगर्भतेवर आणि समीक्षात्मक मूल्यांवर त्यांनी अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला. दुसऱ्या व्याख्यानात 'पाण्यारण्य : तृष्णेची शोधयात्रा (आदिबंधात्मक अन्वयार्थ)' या समीक्षा ग्रंथावर डॉ. रमेश माने यांनी सैद्धांतिक स्वरूपाची मूलभूत चर्चा केली. त्यांनी दिनकर मनवर यांच्या कवितेची विविध उदाहरणे देत त्यांच्या कविते चर्चा झाली.

यावेळी कवी दिनकर मनवर यांच्या काही प्रातिनिधिक कविता डॉ. रमेश माने यांनी सादर केल्या. तसेच डॉ. भगतसिंग पाटील यांच्या समीक्षा लेखनाचे महत्व विशद केले. पुस्तकाचे लेखक, समीक्षक डॉ. भरतसिंग पाटील यांनी आदिबंधात्मक समीक्षा लेखनामागील आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच मराठी समीक्षेची सद्य:स्थितीवरही त्यांनी प्रकाश टाकला. संदीप घोरपडे यांनी डॉ. भरतसिंग पाटील यांच्या समीक्षेचे महत्व सांगितले. प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सेवानिवृत्त प्रा. डी. डी. पाटील, माजी प्राचार्य डॉ. एस. आर. चौधरी, डॉ. धीरज वैष्णव, डॉ. विजय तुंटे, सौ. सीमा भरतसिंग पाटील, डॉ. जतीन भरतसिंग पाटील, उपप्राचार्य डॉ. कल्पना पाटील, डॉ. विजय मांटे, डॉ. अशोक पाटील, डॉ. योगेश तोरवणे, मसाप शाखेचे पदाधिकारी नरेंद्र निकुंभ, भारती सोनवणे, विजया गायकवाड, तसेच मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. योगेश पाटील, प्रा. सागर सैंदाणे, प्रा. तुषार पाटील, प्रा. गोपाल बडगुजर, डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व शहरातील साहित्य रसिक उपस्थित होते. प्रमुख कार्यवाह दिनेश नाईक यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर मराठे यांनी आभार मानले. ▲

## अमळनेरात मसाप, मराठी विभागाचा अभिनव उपक्रम



# (स्व.) अटल बिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त अमळनेरात भाजपच्या दोन गटांतर्फे अभिवादन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : भारतरत्न (स्व.) अटल बिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त येथील भाजपच्या दोन गटांतर्फे प्रतिमापूजन करून अभिवादन केले. गुरुवार, दि. २५ डिसेंबर रोजी सकाळी बाजार समितीसमोरील (स्व.) उदयबापू वाघ यांच्या स्मारकाजवळ एका गटातर्फे, तर दुसऱ्या गटातर्फे न्यू व्हीजन स्कूल येथे अभिवादन करण्यात आले.

(स्व.) उदयबापू वाघ यांच्या स्मारकासमोरील कार्यक्रमप्रसंगी माजी जि. प. सदस्य ॲड. व्ही. आर. पाटील, लालचंद सैनानी, भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, राकेश पाटील, घनश्याम पाटील, शिवकिरण बोरसे आदी उपस्थित होते.

न्यू व्हीजन स्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमप्रसंगी अजय केले, विजय पाटील व दीपक पवार यांनी (स्व.) अटल बिहारी वाजपेयींच्या कार्यावर प्रकाशझोत टाकला. याप्रसंगी शितल देशमुख, उमेश वाल्हे, महेश पाटील, प्रा. पटवर्धन, दिलीप ठाकुर, दिलीप साळी, दीपक पाटील, गणेश बडगुजर, देवा भोई, मुन्ना कोळी, राम कलोसे, महेश संदानशिव, सागर बारी, सुभाष पाटील, प्रभाकर बडगुजर, बबलू बोरसे, अमोल धाडकर, चंद्रशेखर कुळकर्णी, नीलेश लांडगे, धनराज महाजन, श्याम भावसार, किरण भावसार, रावसाहेब सूर्यवंशी, विजय पाटील, तुळशीराम हटकर, युवराज चौधरी, श्रीमती माधुरीताई पाटील आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ▲



ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




## नारायणदास महाराज कोटीतीर्थ




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नारायणदास महाराज कोटीतीर्थ हे कोल्हापूरजवळील एक पवित्र ठिकाण आहे. तेथे श्री सद्गुरू नारायणदास महाराज यांचे स्थान (मठ/मंदिर) आहे. हे ठिकाण कोटीतीर्थ या नावाने ओळखले जाते. ते धार्मिक पर्यटनासाठीही प्रसिद्ध आहे. जेथे अनेक भाविक दर्शनासाठी आणि आध्यात्मिक शांततेसाठी येतात. हे ठिकाण कोल्हापूरपासून फार दूर नसून, येथील परिसर शांत आणि पवित्र मानला जातो. येथे दरवर्षी २५ डिसेंबर रोजी धार्मिक उत्सव साजरा केला जातो.

भाविक येथे दर्शनासाठी आणि आध्यात्मिक शांतीसाठी भेट देतात. हे ठिकाण खास करून कोल्हापूर परिसरातील धार्मिक स्थळांमध्ये गणले जाते. पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.

# घरात ठेवा लक्ष्मीची अशी शुभ मूर्ती

## कधीच भासणार नाही पैशांची कमतरता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देवी लक्ष्मी यांना वैभवाची देवता मानले गेले आहे. देवी लक्ष्मी या धन्य, धान्य, स्थिरता आणि समृद्धी देणाऱ्या देवता आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीध्ये सणासुदीच्या काळात देवी लक्ष्मी यांची मनोभावे पूजा केली जाते. मात्र देवी लक्ष्मींच्या योग्य मूर्तीची प्रतिष्ठापना केली तरच आपल्याला त्याचे योग्य फळ मिळू शकते. देवी लक्ष्मी यांचा आपल्याला कृपाशीर्वाद मिळू शकतो.

देवी लक्ष्मी यांची मूर्ती घरात स्थापित करताना वास्तू नियमांचे पालन करणे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. जशी योग्य दिशा आणि योग्य मूर्ती आपल्याला लाभ देऊ शकते तशीच चुकीची प्रतिमा आणि चुकीची दिशा आर्थिक नुकसानकारक ठरू शकते.

### देवी लक्ष्मी धन, वैभव आणि समृद्धीची देवता

देवी लक्ष्मी यांना धन, वैभव आणि समृद्धीची देवता मानले जाते. प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते, की त्यांच्या घरात कधीही पैशांची कमतरता भासू नये. जीवनात सुख-शांती नांदावी. याच इच्छेने लोक देवी लक्ष्मी यांची पूजा करतात. त्यांच्या आशीर्वादासाठी घरात




त्यांची मूर्ती किंवा छायाचित्र स्थापित करतात. मात्र वास्तुशास्त्रानुसार देवी लक्ष्मी यांची मूर्ती योग्य स्वरूपात, योग्ये दिशेत आणि योग्य पद्धतीने ठेवणे खूप महत्त्वाचे असते. चुकीची मूर्ती निवडणे किंवा चुकीच्या ठिकाणी स्थापना केल्यास सकारात्मक ऊर्जा कमी होऊ शकते. आर्थिक अडचणीही येऊ शकतात.

### देवी लक्ष्मी यांची कोणती मूर्ती शुभ मानली जाते

वास्तू आणि ज्योतिषशास्त्रानुसार देवी लक्ष्मी यांची सर्वांत शुभ प्रतिमा ती मानली जाते ज्यामध्ये त्या कमळावर बसलेल्या असतात आणि त्यांचे दोन्ही पाय कमळच्या आत असतात. ही मुद्रा स्थैर्य, समृद्धी आणि सातत्याने धनप्राप्तीचे प्रतीक आहे. कमळावर उभ्या असलेल्या लक्ष्मींची मूर्ती घरात ठेवणे टाळावे. कारण ती अस्थिरतेचे संकेत मानली जाते. ज्यामुळे धन टिकत नाही, अशी धारणा आहे.

### उभी मुद्रा आणि काही चित्रे टाळावीत

देवी लक्ष्मी यांची उभी मूर्ती घरात ठेवू नये, असे मानले जाते. तसेच ज्या चित्रामध्ये देवी लक्ष्मींबरोबर घुबड (उल्लू) दाखविलेले असते ते चित्र घरात लावण्याची शिफारस केली जात नाही. जरी घुबड हे त्यांचे वाहन असले, तरी गृहस्थ जीवनात ते अशुभ मानले जाते. त्याऐवजी गरुडावर विराजमान असलेली भगवान विष्णू-देवी लक्ष्मी यांची प्रतिमा शुभ मानली जाते. लक्ष्मींसोबत हत्तींची जोडी असलेली प्रतिमा देखील ऐश्वर्य आणि सौभाग्य वाढविणारी मानली जाते.

### श्रीगणेश-लक्ष्मींची संयुक्त मूर्ती कधी ठेवावी?

देवी लक्ष्मी आणि श्रीगणेश यांची संयुक्त मूर्ती किंवा चित्र केवळ दीपावलीच्या पूजनासाठीच योग्य मानले जाते.

### मूर्तीची सामग्री कशी असावी?

देवी लक्ष्मींची मूर्ती दगड (शिला), धातू किंवा मातीची असावी. प्लास्टिक किंवा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती वास्तुशास्त्रात अशुभ मानल्या जातात. कारण त्यामधून सकारात्मक उर्जेचा संचार होत नाही.

### देवी लक्ष्मींची मूर्ती कोणत्या दिशेला ठेवावी?

वास्तुशास्त्रानुसार देवी लक्ष्मींची मूर्ती घराच्या उत्तर-पूर्व दिशेत म्हणजेच इशान्य कोनात ठेवणे सर्वांत शुभ मानले जाते. पूजा करताना हे लक्षात घ्यावे, की देवी लक्ष्मींचे मुख उत्तर दिशेकडे असावे. तसेच घरात एकापेक्षा अधिक लक्ष्मींच्या मूर्ती किंवा छायाचित्रे ठेवू नयेत. कारण यामुळे उर्जेचे संतुलन बिघडू शकते, अशी धारणा आहे.

# व्यक्ति को नर्क के द्वार तक ले जाती हैं ये ३ बुराइयां

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवद गीता में भगवान श्रीकृष्ण ने नरक के तीन द्वार बताए हैं, जो व्यक्ति के पतन का कारण बन सकते हैं। गीता के अनुसार, ये तीनों प्रवृत्तियां व्यक्ति को विनाश की ओर ले जाती हैं। ऐसे में इन चीजों से दूरी बनानी चाहिए। चलिए जानते हैं इस बारे में।

भगवान श्रीकृष्ण द्वारा अर्जुन को दिया गया गीता का ज्ञान, सर्वश्रेष्ठ ज्ञान माना जाता है। गीता एकमात्र ऐसा ग्रंथ है, जिसमें लिखा हर शब्द स्वयं भगवान श्रीकृष्ण के श्रीमुख से निकला है। इसलिए इस ग्रंथ के हिंदू धर्म में इतना महत्वपूर्ण माना गया है। आज हम आपको गीता के अनुसार, ऐसे 3 काम बातने जा रहे हैं, जिन्हें पाप की श्रेणी में रखा जाता है।

**त्रिविधं नकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्**
**॥**

भगवद्गीता के इस श्लोक में बताया गया है कि काम, क्रोध और लोभ, ये तीनों नरक के द्वार हैं, जो आत्मा का नाश करते हैं। इसलिए इन तीनों का त्याग करने में ही भलाई है।

**श्रीमद्भगवद्गीता के इस श्लोक में छिपा है रहस्य**

व्यक्ति की ये तीनों प्रवृत्तियां उसे पनत की ओर ले जाती हैं। ऐसे में अगर आप एक कल्याणकारी जीवन की कामना रखते हैं, तो इनका त्याग कर दें।

चलिए जानते हैं कि ये तीनों आपके लिए कैसे कष्टकारी साबित हो सकती हैं –

**१) काम**

काम यानी व्यक्ति के मन की वासना को भी गीता में नर्क के द्वार की ओर ले जाने वाला बताया गया है। इसके कारण व्यक्ति की आसक्तियां और वासनाएं बढ़ने लगती है, जिसके कारण व्यक्ति पाप का आचरण करने लगता है। इसलिए गीता में यह बताया गया है कि व्यक्ति की काम वासना उसे अधोगति (पतन) की ओर ले जाती है।

**२) क्रोध**

क्रोध से मनुष्य के मन में भ्रम की स्थिति पैदा करता है और उसका विवेक भी काम नहीं करता। जब व्यक्ति क्रोध में होता है, तो उसके सोचने समझने की शक्ति भी नष्ट हो जाती है, जिससे कई बार वह गलत फैसले ले लेता है या फिर हिंसा, अपशब्द और बुरे कर्मों में लिप्त हो जाता है। इसका सीधा प्रभाव व्यक्ति के भविष्य पर पड़ता है। ऐसे में क्रोध व्यक्ति को विनाश की ओर ले जाता है। इसलिए गीता में क्रोध को भी पतन की ओर ले जाने वाला बताया गया है।

**३) लोभ**

लोभ अर्थात लालच, उन 3 प्रवृत्तियों में से एक माना गया है, जो व्यक्ति का विनाश की ओर ले जाता है। गीता में अर्जुन को उपदेश देते हुए भगवान श्रीकृष्ण कहते हैं कि चाहे व्यक्ति को जीवन में सबकुछ क्यों न मिल जाए, लेकिन वह कभी संतुष्ट नहीं होता, क्योंकि व्यक्ति के मन का लालच कभी समाप्त नहीं होता। और पाने की लालसा व्यक्ति को अधर्म के मार्ग पर ले जाती है। इसलिए लालच भी व्यक्ति के पतन का कारण बन सकता है।

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांचा वियोग का झाला होता? देवी लक्ष्मीच्या स्वयंवराची अनोखी कहाणी. शुक्रवारच्या सायंकाळी देवी लक्ष्मी यांची पूजा केली जाते. अशी मान्यता आहे, की शुक्रवारी विधीवत पूजा केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि भक्तांवर पैशांचा पाऊस करते. घरात सुख-शांती आणि समृद्धी बनवून ठेवण्यासाठी भाविक शुक्रवारच्या दिवशी देवी लक्ष्मीची पूजा करतात. अशी मान्यता आहे, की देवी लक्ष्मीची पूजा केल्याने पैशांची कधीही कमतरता भासत नाही.
धर्मग्रंथांमध्ये लक्ष्मीला धन-समृद्धीची देवी मानले जाते. त्यांना भगवान विष्णूंची पत्नी आणि आदिशक्ती 'ही म्हटले जाते. धनाची देवी लक्ष्मी यांना प्रसन्न करण्यासाठी लोक अनेक प्रकारचे उपाय करतात. पण देवी लक्ष्मी आणि प्रभू नाराणय यांच्या विवाहाची ही अनोखी कथा माहिती आहे.

पौराणिक कथेनुसार देवी लक्ष्मी यांचे स्वयंवर आयोजित करण्यात आले होते. पण देवी लक्ष्मी यांनी आधीच आपल्या मनाचे नारायण यांना स्थान दिले होते. देवी लक्ष्मी यांनी नारायण यांनी आपला पती म्हणून निवडले होते. पण नारद मुनी देखील लक्ष्मी यांच्यासोबत विवाह करण्यास इच्छुक होते. तेव्हा नारदांनी विचार केला, की त्यांना हरिच्या रूपात पाहून देवी लक्ष्मी त्यांचे वरण करतील. तेव्हा नारद हे भगवान विष्णूंकडे गेले आणि त्यांनी हरिप्रमाणे सुंदर रूप मागितले. प्रभू नारायण यांनी त्यांची ही इच्छा पूर्ण करत त्यांना हरि रूप दिले. हरि रूपात नारद जेव्हा राजकुमारी लक्ष्मी यांच्या स्वयंवरात पोहोचले तेव्हा त्यांना विश्वास होता, की राजकुमारी लक्ष्मी त्यांच्याच गळ्यात वरमाला घालेल, पण असे झाले नाही.

राजकुमारीने नारद यांच्या गळ्यात नव्हे, तर नारायण यांच्या गळ्यात वरमाला घातली. त्यानंतर नारदजी तेथून निराश होऊन परतत होते तेव्हा त्यांनी रस्त्यात एका जलाशयात स्वतःचा चेहरा पाहिला. आपला चेहरा पाहून नारद हैराण झाले. कारण त्यांचा चेहरा माकडासारखा दिसत होता.

### हरिचे दोन अर्थ

' हरि 'चा एक अर्थ भगवान विष्णू होतो, तर एक अर्थ माकड असा होतो. भगवान



**भगवान विष्णू**

विष्णूंनी नारदाला माकडाचे रूप दिले. नारद यांना कळाले, की भगवान विष्णूंनी त्यांच्यासोबत कपट केला. त्यामुळे नारद अत्यंत क्रोधीत झाले. नारदांनी थेट वैकुंठ गाठले आणि आक्रमक होऊन नारायणाला श्राप दिला की तुम्हाला मनुष्यरूपात जन्म घेऊन पृथ्वीवर जावे लागेल. ज्याप्रकारे मला स्त्री वियोग सहन करावा लागला त्याचप्रकारे तुम्हालाही पत्नी वियोग सहन करावा लागेल. त्यामुळे प्रभू श्रीरामचंद्र आणि सीतेच्या रूपात जन्म घेऊन नारायण आणि देवी लक्ष्मी यांना वियोग सहन करावा लागला होता.

भगवान विष्णू आणि महालक्ष्मी यांच्या कथा विविध पौराणिक कथा, व्रत कथा आणि लोककथांमध्ये आढळतात. ज्यात त्यांच्यातील प्रेम, विरह उदा.- नारदांच्या शापामुळे प्रभू श्रीरामचंद्र- माता सीता यांच्या रूपात विरह आणि पुन्हा मीलन, उदा.- लक्ष्मीनारायण कथा. तसेच देवीच्या वैभवाचे वर्णन करणाऱ्या ' महालक्ष्मी व्रत कथा ' आणि ' वैभव लक्ष्मी व्रत कथा ' यांचा समावेश आहे. या कथांमध्ये विष्णू आणि लक्ष्मीच्या अवतारांच्या माध्यमातून त्यांचे दैवी नाते आणि संपत्तीचे प्रतीक म्हणून लक्ष्मीचे महत्त्व सांगितले जाते.

### लक्ष्मी-नारायण कथा

या कथांमध्ये विष्णू आणि लक्ष्मीचे नित्य नाते, त्यांचे अवतार (रामावतार आणि सीता) आणि त्यांच्यातील प्रेम व त्यांचे कार्य (नारायण म्हणजे पालनकर्ता आणि लक्ष्मी म्हणजे संपत्ती) याचे वर्णन असते. यामध्ये अनेकदा नारदमुनींच्या शापामुळे झालेल्या विरहाची कथाही असते. ज्यात राम-सीता आणि कृष्ण-राधा यांच्या अवतारांचा उल्लेख येतो.

महालक्ष्मी व्रत कथा
ही कथा एका गरीब ब्राह्मणाच्या धनेश्वराची आहे. ज्याने महालक्ष्मीचे व्रत केले आणि देवीच्या कृपेने त्याला अमाप धनसंपत्ती मिळाली, असे सांगितले जाते. या कथेमुळे लक्ष्मीची कृपा प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.

### वैभवलक्ष्मी व्रत कथा

ही कथा शुक्रवारच्या व्रताशी संबंधित आहे. ज्यात माता लक्ष्मींच्या वैभवाचे वर्णन असते. यातही भगवान विष्णू आणि लक्ष्मी यांच्या मीलनाचे आणि वैभवाचे प्रसंग येतात. ज्यामुळे घरात सुख-समृद्धी नांदते, असे मानले जाते. कोल्हापूरच्या अंबाबाई (महालक्ष्मी) आणि भगवान विष्णू (बालाजी) यांच्याशी संबंधित कथा : काही कथांमध्ये देवी महालक्ष्मी आणि भगवान विष्णू यांच्यातील प्रेमाचे वर्णन आढळते. जेथे विष्णू तिरुपती बालाजींच्या रूपात असतानाही महालक्ष्मी त्यांच्यासोबत असते, असे सांगितले जाते, विष्णू आणि लक्ष्मीच्या कथा या दैवी प्रेम, संपत्ती आणि वैभवाचे प्रतीक आहेत. या कथांद्वारे भक्तांना लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी आणि जीवनात सुख-समृद्धी आणण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

